665

क्रमांक:जमीन-२६९०/२०१३५१/प्र.क्र.१११८/ज-२
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : २१ डिसेंबर, १९९०

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
मौजे तुर्भे, मंडाले, मानखुर्द व वाडीबंदर
तालुका कुर्ला येथील जमीन आपल्या कंपनीस
३० वर्षांचे भाडेपट्ट्याने देण्याबाबत...

ज्ञापन:-
=====

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई यांना त्यांच्या क्रमांक:सी-३४/३७/२-बी/ डी-००७८, दिनांक ८.११.१९९० या वरील विषयाच्या त्यांच्या अनुषंगाने विज्ञप्तीपूर्वक कळविण्यात येते की, मे. पेंडुर पाताळगंगा पाईप लाईन्स[लि.] यांना बी.पी.सी.एल.च्या रिफायनरीपासून पाताळगंगा येथील औद्योगिक इमारती-मधील रिलायन्स इंडस्ट्रिज लि. यांचे दरम्यान मानखुर्द ते वाडी बंदर पर्यंतच्या पट्ट्यात जमिनीच्या खालून पाईप लाईन्स टाकण्यासाठी शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, समक्रमांक दिनांक ११.१०.१९९० अन्वये ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने पुढीलप्रमाणे नमूद केलेली जमीन देण्यास शासनाने मंजुरी दिली आहे :-

| | चौ. मी. |
|---|---|
| १]मौजे तुर्भे, न.भू.क्र.१ व २ | १२,९२०.०० |
| २]मौजे मंडाले, न.भू.क्र.६/१ | ४६,०८०.०० |
| ३]मौजे मानखुर्द न.भू.क्र.१ | ३३,०८०.०० |
| ४]वाडीबंदर | १६,८००.०० |
| ५]सी.पी.स्टेशन डायोड स्टेशन, व्हाल्व स्टेशन वगैरे | ११,१९२.१५ |
| | १,२०,०७२.१५ |

२. कंपनीने दिनांक २२.१०.९० च्या पत्राद्वारे असे निदर्शनास आणले की, प्रत्यक्षात त्यांना इतक्या जमिनीची गरज नाही. कंपनीच्या विनंतीचा विचार करून शासन असा निर्णय घेतला आहे की, उपरोक्त शासन ज्ञापनाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या जमिनीपैकी फक्त खाली नमूद केलेली जमीन उपरोक्त दि.११.१०.१९९० च्या शासनातील अटी व शर्ती व त्या अटींपैकी अट क्र.७ ऐवजी खालीलप्रमाणे सुधारित अटीवर देण्यात यावी:-

.....२/-

९.४३९४

| | |
|---|---|
| | ४,०००चौ.मी. |
| १] वरनील शासन ज्ञापन दि. २१.५.१९९० अन्वये मंजूर करण्यात आलेली जमीन | ८४० चौ.मी. |
| २] बाडोपैकी ..... | |
| ३] टी.पी. स्टेशन डायोड स्टेशन व ट्रॉल्व स्टेशन इ. | १,१८२.२५चौ.मी. |
| | ६,०२२.२५चौ.मी. |

सुधारित अट क्र.७:- " मंडाले येथील स.नं. ८९ च्या जमिनीच्या मालकी हक्काबाबतचा वाद उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. व त्या संबंधात न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[जयंत व. दिवाण]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई.

प्रतिलिपी रवाना:-
१] आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२] जमाबंदी आयुक्त, आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३] संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४] उपसंचालक, नगर रचना, मुंबई विभाग,
५] सहाय्यक संचालक, नगर रचना, मुंबई उपनगर जिल्हा
६] जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा.
७] महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-१, [लेखा व अनुज्ञेयता]
८] नगर विकास [नवि-२१]मंत्रालय, मुंबई.
९] वित्त विभाग[व्यय-२]मंत्रालय, मुंबई.
१०] पर्यावरण विभाग.
११] ज-३ कार्यासन, [निवड नस्ती]महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner

क्र. सो/२४, २५, २७/२. पी/डी. ०००८
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
बी.एस.आर.डी.ए. इमारत, २ रा मजला,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१
दिनांक: 10 JAN 1991

प्रति

मुख्य व्यवस्थापक
चेंबूर पाताळगंगा पाईप लाईन्स लि.
७१२/८०७ अम्बोली सेंटर,
नरीमन पॉईंट, मुंबई ४०००२१

विषय: जमीन: मुंबई उपनगर जिल्हा
मौजे तुर्भे मंडाळे मानखुर्द व खाडीपैकी,
तालुका कुर्ला येथील ६०२९.२५ चौ.मी.
जमीन ३० वर्षांचे भाडेपट्टयाने देणेबाबत.

शासन महसूल व वन विभागाने खालील दर्शविलेल्या जमीन मेसर्स चेंबूर पाताळगंगा पाईप लाईन्स लि. या कंपनीस पाईप लाईन्स टाकणेसाठी सी.पी. स्टेशन डायोड स्टेशन व व्हाल्व स्टेशन इत्यादीसाठी ३० वर्षांचे भाडेपट्टयाने द्यावयाचे ठरविले आहे. तरी आपणांस विनंती करण्यांत येते की, आपण खालील बाबीची पूर्तता करावी.

| | | |
|---|---|---|
| १) | मौजे तुर्भे न.भू.क्र. १ व २, मौजे मंडाळे न.भू.क्र. ६/१ व मौजे मानखुर्द न.भू.क्र. १ वगैरे/ या कार्यालयाच्या दि. ३.७.९० च्या आदेशाअन्वये प्रदान करण्यांत आलेली जमीन. | ४०००.० चौ.मी. |
| २) | खाडी पैकी - | ८४०.०० " |
| ~~३)~~ | ~~खाडी-पैकी~~, सी.पी. स्टेशन डायोडा स्टेशन, व्हाल्व स्टेशन इत्यादी मौजे तुर्भे न.भू.क्र. १ पैकी व २ पैकी, मौजे मंडाळा न.भू.क्र. ६ पैकी व मौजे मानखुर्द न.भू.क्र. १ पैकी. | ११८९.२५ " |
| | एकूण | ६०२९.२५ " |

१) उपरोक्त ६०२९.२५ चौ.मी. जमिनीचे प्रति चौ.मी. रु.४६५/- या चालू बाजारभावाप्रमाणे होणाऱ्या रकमेच्या ८% रुपये इतके तात्पुरते प्रतिवर्षी भाडे रु.२,२४,२८८.१० आगाऊ रक्कम या कार्यालयात भरणा करावी. कंपनीने उपरोक्त ४००० चौ.मी. जमिनीची भाडेपट्टयाची रक्कम रु.१,४८,८००/- या कार्यालयात भरणा केलेली आहे. आता फरकाची रक्कम रु.७५४८८.१० या कार्यालयात आगाऊ भरणा करावी.

२) कंपनीने खालील अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे रु.५/- च्या मुद्रांकीत पेपरवर बंधपत्र या कार्यालयात आ[illegible]

जबाबदारी ही कंपनीची राहील. सर्वसामान्य जनतेच्या जिवितास व मालमत्तेस नुकसान पोहचल्यास त्यास कंपनी जबाबदार राहील. तसेच पाईप लाईन्समुळे कोणत्याही प्रकारचे प्रदुषण होणार नाही याची जबाबदारी कंपनीने घ्यावी व प्रदुषण झाल्यास त्याला देखील कंपनी जबाबदार राहील.

४] पाईप लाईन्ससाठी देण्यात येणाऱ्या क्षेत्राचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्याची जबाबदारी कंपनीची राहील मात्र या जमिनी भोवती कुंपण कंपनीस घालता येणार नाही.

५] प्रश्नांकीत जमिनीच्या पृष्ठभागाखाली पाईप लाईन्स टाकण्याची कार्यवाही झाल्यानंतर त्या जागेचा योग्य इतर कारणांसाठी वापर करण्याचा अधिकार शासनास राहील.

६] पाईप लाईन्स टाकण्यास देण्यात आलेली परवानगी ही सदर प्रस्तावास अंतिम रित्या मंजुरी देण्यासंबंधी पर्यावरण विभाग जो निर्णय घेईल त्या निर्णयास अधिन राहुन देण्यात येत आहे. त्या विभागाने तसेच इतर संबंधीत विभागानी ना हरकत दाखले दिल्याशिवाय प्रश्नाधीन पाईप लाईन्सचा वापर सुरु करता येणार नाही.

७] मंडाळे येथील सर्वे नंबर ८९ च्या जमिनीच्या मालकी हक्काबाबत वाद उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे व त्या संदर्भात न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात येईल.

८] नं जमिनीचा तुरुन्त भाडेपट्टा दर १० वर्षांनी आकारण्यात येईल.

९] कंपनीने एक वर्षाची भाडेपट्ट्याची आगाऊ रक्कम डिपॉझिट म्हणून शासनास भरणा केली पाहिजे.

१०] कंपनीने प्रत्येक वर्षाची भाडेपट्ट्याची रक्कम मागे जानेवारीमध्ये तहसिलदार कुर्ला टोपीवाला कॉलेज, मुलुंड यांचेकडे मागणी न करता जमा करावयाची आहे.

उपरोक्त अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे मुद्रांकीत हमीपत्र या कार्यालयात सादर केल्यानंतर व भाडेपट्ट्याची फरकाची रक्कम या कार्यालयात भरणा केल्यानंतर पुढील आदेश निर्गमित करण्यात येतील.

स्वा/प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही आहे

२०/७/९७

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता.

Scanned by CamScanner